महाराष्ट्र मंडळ डेट्रॉइट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

# स्नेहबंध - विशेषांक

## सप्टेंबर 2025

# गणेशोत्सव

## गणपती बाप्पा मोरया!

आपले मंडळ

**|| Maharashtra Mandal of Detroit ||**



*Ganesh Chaturthichya Subhecha*

**From**

**Prabhakar Patil & family**

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | निमित्त गणेशोत्सवाचं! | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ४ |
| २ | जादूचा पेटारा | पूनम तोरगल | ८ |
| ३ | बाबा | शुभदा प्रभाकर कुलकर्णी | १३ |
| ४ | नात निघाली कॉलेजला | शमा सुखटणकर | १७ |
| ५ | माझा आवडता सण निबंध | श्रीयन बापट (ट्रॉय मराठी शाळा) | २१ |
| ६ | एक तरी ओवी अनुभवावी | डॉ. वीणा शाह | २७ |
| ७ | बाप्पा | संजय अहिरे | ३१ |
| ८ | कधीकधी संध्याकाळी | विभावरी देशपांडे | ३५ |
| ९ | चालता चालता | डॉ. देवदत्त कुलकर्णी | ३९ |
| १० | उंच उंच माझा झोका | सुरेश नायर | ४४ |
| ११ | Host and Hospitality | प्रांजली आढाव | ४६ |
| १२ | काय आणलं? | सौ. वसुधा टाकळकर | ४९ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!


**संपादक :**
ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ:**
अन्विता वाळेकर
अर्चिता बडवे

**रचना व मांडणी :**
अश्विनी राहुल पारठे

# निमित्त गणेशोत्सवाचं !

नमस्कार, वाचकहो! २०२५ चा गणपती विशेषांक आपल्या हातात देताना मला जास्त आनंद होत आहे कारण अनेक महिन्यांनी लेखांची संख्या वाढली आहे. असाच प्रतिसाद कायम मिळू दे.

मागच्या काही अंकात जाहिरातींच्या झगझगाटापुढे छापील मजकूर कमीच होता हे आम्हांला व वाचकांनाही जाणवत असे. खरं तर ही आनंदाची गोष्ट आहे!
का?
'स्नेहबंध'ची आद्य आवृत्ती म्हणजे पन्नास वर्षांपूर्वी हाताने लिहिलेले 'नस्ती उठाठेव' हे पत्रक! ते नाव किती योग्य होतं! नाहीतरी शिक्षण, नोकरी, संसार, भर थंडीत driving हे सर्व सांभाळून 'मराठी मंडळ' नामक कुटुंबाची जबाबदारी घ्यायची आणि उत्साहाने नवनवे कार्यक्रम करत, बाहेरून आणत व पाहत राहायचे ही 'नस्ती उठाठेवच' की हो! पण गेल्या पन्नास वर्षांत या उठाठेवीला अनेक उद्योजकांचा, दुकानांचा व्यावसायिक लोकांचा जोरदार आर्थिक पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे मंडळाचे आणि पर्यायाने 'स्नेहबंध'चेही रूप बदलते आहे.

आता या बदलाविषयी थोडंसं...

पन्नासेक वर्षांपूर्वी अमेरिकेत आलेली मराठी कुटुंबं गणेश चतुर्थीच्या दरम्यान एकत्र येत आणि गणेशोत्सव साजरा करीत. आता अनेकांकडे दीड दिवसांचा, ५ दिवसांचा किंवा गौरी गणपती येतो आणि बाकीची लोकं त्यांच्याकडे जाऊन दर्शन घेतात आणि त्यानिमित्ताने सकाळचं, रात्रीचं जेवण, प्रसाद यांचा आस्वाद घेतात. म्हणजे केवळ सभासदांची संख्याच वाढली आहे असं नाही तर त्यांच्या अपेक्षा, सांस्कृतिक गरजा, जाणिवा देखील बदलल्या आहेत. त्या पूर्ण करायचं कठीण काम आपलं सक्षम मंडळ उत्साहाने आणि मनापासून करतं.

जेंव्हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, एका कमिटीकडून पुढच्या कमिटीकडे मंडळाचं ('स्नेहबंध'सकट!) हस्तांतर होतं तेंव्हा फक्त धरणारे हातच नाही बदलत तर बघणारे डोळे देखील बदलतात. आपोआपच करमणुकीचे प्रकार, जेवणाच्या रुची यात स्थित्यंतर होते.

एरवी 'योजकस्तत्र दुर्लभ:' असं म्हणतात पण आमच्या मराठी मंडळात प्रत्येक कार्यक्रमाला - हे स्थित्यंतर समजून घेणारे - दोन हिरे मिळत असतात. कधी इथेच अनेक वर्ष काम करून तयार झालेले तर कधी नव्याने येऊन ती जबाबदारी ताकदीने पेलणारे. (त्याविषयी अंकात वाचालच.) त्यांच्या साथीला अहोरात्र झटणारे (परवा रात्री अडीचपर्यंत त्यांची Whatsapp चर्चा चालली होती!) बाकीचे स्वयंसेवक असतातच. गणपतीच्या सोहळ्याला तर इतर अनेक राज्यातील बालक पालक जातीने हजर असतात. त्या सर्वांचं मनापासून स्वागत करायचं, आबालवृद्धांची (वय १० महिने ते ९० वर्ष!) आस्थेने काळजी घ्यायची (वर्षभरात अनवधानाने झालेल्या चुका निस्तरायच्या!) हे शिवधनुष्य पेलणाऱ्या आतापर्यंत 'प्रोग्रॅम मॅनेजर' झालेल्या सर्व आजी-माजी सभासदांना त्रिवार सलाम!

तर - या जगात शाश्वत फक्त एकच आहे ते म्हणजे 'बदल'. तो बदल स्वीकारून आपल्या परंपरा हौसेने जपणाऱ्या 'महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट' या 'बदलत्या' कुटुंबाला हे सणासुदीचे दिवस आनंदाचे जावोत ही सदिच्छा!

आपली,

**– ज्योत्स्ना दिवाडकर**



# Pradeep Kokate & Family



*Wishes you all A very*
*Happy Ganesh Chaturthi!*

गणपती बाप्पा मोरया

# Dr. Raman Saluja

**Wishes you all**
**Ganpati Bappa Morya**






meijer

Wishes you all

श्री गणेश चतुर्थीच्या
हार्दिक शुभेच्छा



# जादूचा पेटारा



रविवार सकाळ! नवरा सकाळी-सकाळीच बाहेर गेला होता. त्यामुळे मी एकटीच होते. कणिक मळायला घेतली आणि "टिंग-टिंग-टॉग टिंग-टिंग-टॉग!" बेल वाजली. आत्ता ह्या वेळी कोण? सकाळी तर कुणीच येण्याचा प्लॅन नव्हता. रिंग ॲप उघडलं तर बाहेर फेडेक्सचा माणूस एक मोठा बॉक्स घेऊन उभा. मी डाव्या हाताने दार उघडलं आणि बॉक्स आत ठेऊन घेतला. काय बरं असेल ह्यात! नाव-पत्ता तर आमचाच होता. तितक्यात नवऱ्याचा फोन वाजला - "आलं तुझं सरप्राईज!" मला काहीच कळेना. "कसलं सरप्राईज - अरे काय आणलंय" - मी थोड्या चिडचिड्या स्वरात विचारलं "अगं, उघडून तर बघ, म्हणजे कळेल!" म्हणून त्याने फोन ठेवला देखील. हात अर्धवट ओले, थोडे चिकट (पिठात बरबटलेले म्हणा ना..) आता आली का पंचाईत. असो! पण उत्सुकता तर भारी होती. मी पटकन कणिक मळून घेतली आणि बॉक्स उघडला!



'मी आलो!" समोरच्या बॉक्स मधला नवा, चमचमता टर्नटेबल म्हणाला. मी चमकलेच! हो, म्हणजे आपण टर्नटेबल घेऊया अशी चर्चा आम्ही काहीकाळ करत होतो पण असा सरप्राईज येईल अशी मला काहीच कल्पना नव्हती. मी मनातून सुखावले. हा माझा बाळपणीचा मित्र. माझं मन थेट मागे धावलं – माझ्या लहानपणी - वय सुमारे पाच-सहा. आमच्या त्या जुन्या रेडिओग्रामकडे.
मी टर्नटेबलला विचारलं – "तुला आठवतं का, आपली मैत्री किती जुनी आहे?"

खरंतर रेडियोग्राम ही माझ्या बाबांची हौस. ते पोलिस ऑफिसर होते. त्यामुळे घरी येण्याला काही वेळापत्रक नाही. घराच्या भिंतींनाही शंका यायची, हा माणूस इथेच राहतो का याची. पण एक गोष्ट मात्र कायम – घरात पाऊल टाकलं की आधी गाणी लागायची आणि मग बूट काढले जायचे. कधीकधी तर बाबांना अगदी १० मिनिटंच असायची. बूटसुद्धा काढायचे नाहीत. तसेच युनिफॉर्म मधे राहायचे. पुन्हा ड्युटीवर जायच्या आधी दोन घास पोटात घालायला आलेले बाबा, आई एक भाकरी घालेपर्यंत गाणं मात्र ऐकायचे. कधी भजनं, कधी नाट्यसंगीत, कधी शास्त्रीय संगीत, कधी गझल, तर कधी हिंदी चित्रपटगीतं. पण बाबांचा खरा जीव होता तो - तलत महमूद! सुट्टीच्या दिवशी बाहेरच्या खोलीत "जलते हैं जिसके लिये", आणि आंघोळ करता करता बाथरूमच्या दरवाज्यावर ठेका धरत बाबांच ते गाणं अजून कानात घुमतंय.

मी नकळत हसले.

टर्नटेबलला (ग्राम) माझ्या मनातलं कळत होते जणू. म्हणाला 'ए - आठवतो तो दिवस?". मी पुन्हा बालपणात पोहोचले. आमच्या घरचा रेडियोग्राम मी कधी उघडायला शिकले हे काही मला पक्कं आठवत नाही. तुळतुळीत डार्कब्राऊन रंगाचं लाकूड - त्याला एक मेटलची किनार. पेटाऱ्यासारखा पण स्लायडिंग उघडायचा - जादूचा पेटाराच होता म्हणा ना. डाव्या बाजूला रेडियो आणि उजव्या बाजूला ग्राम (म्हणजे टर्नटेबल). खाली स्पीकर्स. रेडियो कसा चालवायचा हे तर मला अगदीच चांगलं ठाऊक होतं. पण आईने दटावलं होतं - "उगीच आगाऊपणा करून स्वतःचा स्वतः लावायचा नाही. मोठी माणसं असतानाच लावायचा - बाबा नाहीतर मला सांगायचं - आम्ही लावून देऊ". पण बाबा (आईच्या नजरेआड) मला रेडियो लावायला द्यायचे. रेडियो तर सोपाच होता! ऑनचं बटन टक्क आवाज येईपर्यंत उजव्या हाताला पिरगटायचं, AM किंवा FM च बटन दाबायचं - मग चॅनेलचं बटन पिरगटलं की डायल फिरतो आणि आपल्याला हवं ते गाणं आलं की थांबायचं.

हं, पण आवाज खूप मोठ्याने ठेवायचा नाही. शेजारपाजाऱ्यांना आपल्यामुळे त्रास होता नाही (आणि आई रागावते ते आहेच!). ग्रामचं मात्र जरा अलग कारभार होता. तसं मी बाबांना अनेकवेळा लावताना बघितलं होतं. उजव्या हाताला एक ऑनचं बटन होतं, ते लावायचं. मग रेकॉर्डच्या आकाराप्रमाणे, स्पीड ठरवायचा, मग रेकॉर्ड आत टक्क करून

घालायची, आणि हळुवारपणे नीडल रेकॉर्डवर टेकवायची. बाबा एकदा म्हणाले होते - अगदी नाजूक हाताने करावं लागतं नाहीतर रेकॉर्ड स्क्रॅच (खराब) होते.

"आठवतो न तो दिवस? " ग्रामने पुन्हा आठवण केली.

"आई घरात नव्हती आणि ताई मुकाटपणे एक कोपऱ्यात पुस्तक वाचत पहुडली होती. तशीही ताई तुझ्या मस्तीत सामील नसायचीच. म्हणून तू निर्धास्त. तुला ठाऊक होतं – माझ्या ड्रॉवरमध्ये लपलेला खजिना – खूप साऱ्या रेकॉर्डस. त्यात बाबांनी कालच नवीन रेकॉर्ड आणली होती – कर्ज. रात्रीच 'मैं सोलह बरस की' च्या तालावर नाचली होतीस. तुला आवडलं म्हणून बाबांनी तीच रेकॉर्ड पुन्हा पुन्हा लावली होती. शेवटी आई रागावली (दोघांना) तेव्हा झोपायला गेला होतात". आणि अहो तो दिवस माझ्या डोळ्यासमोर लख्ख उभा राहिला. मी उठायच्या आधीच बाबा ड्युटीवर निघून गेले होते. आई बाजारात काहीतरी घ्यायला गेली होती. त्यामुळे मी आणि ताई फक्त घरात. मी कधीच ग्राम लावला नव्हता म्हणुन काय झालं - काय करायचं ते व्यवस्थित माहीत होतं ना...म्हणून मी ठरवलं – आज मीच लावते!

अंगावर बनीयन आणि फ्रीलची चड्डी. केसाचा घट्ट चंबु. एका हातात वेलचीचं केळं आणि दुसऱ्या हाताने मी रेडियोग्राम स्लाइड करून सराईतपणे उघडला. ड्रॉवर मधून रेकॉर्ड काढून व्यवस्थित टक्क आवाज करून जागेवर घातली. ग्रॅम ऑन केलाच होता. मी नीडल ठेवली आणि गाणं सुरू होण्याआधीच – टक्! दाराचं लॉक वाजलं. मी थरथरले आणि कदाचित ग्रामही. माझ्या अंगातलं रक्त अक्षरशः गोठलं - जागच्याजागी खिळले. काही प्रतिक्रिया द्यायच्या आतच — आई समोर!

एका हातात अजूनही अर्ध सोललेलं वेलची केळं, दुसऱ्या बाजूला आईचा उग्र चेहरा.

गाण्याचा पहिला सूर आला आणि त्याच बरोबर “मैं सोलह बरस की” च्या तालावर आईचे धपाटे. काय बेदम मार खाल्ला मी त्या दिवशी, आहाहा !!!!! मी आठवणीने खदखदून हसले.

"माझी अशी फजिती झालेली पाहून तू मनातल्या मनात हसत होतास ना?" मी ग्रामला विचारले. "तुला तर फार मज्जा आली असेल!".

"मी हसून हसून मेलो असतो, जर आवाज करू शकलो असतो तर!" ग्राम म्हणाला - "पण तुझं कौतुकही तितकंच वाटत होतं. चिमण्या वयातली तुझी स्टाइल, हुरूप आणि मस्तीखोरपणा - सगळंच किती मोहक होतं".

"हो का? कधी कधी अंगी यायचं ते सगळं. पण त्या दिवसापासून आपली गट्टी मात्र एकदम फक्कड जमली" मी म्हणाले.

आईच्या अपरोक्ष ग्राम लावला म्हणून तेव्हा जरी ती रागावली असली तरी त्या दिवसानंतर मला ग्राम लावायची (काळजीपूर्वक) ऑफिशियल परवानगी मात्र मिळाली. आणि मग खूप वर्ष आमची ती संगत रंगली - भारत सोडून इथे येई पर्यंत.

"कुठे हरवला होतास मधल्या काळात " मी उगीच लटक्या रागाने विचारलं त्याला.

"छे अगं ! मी कुठे कधी गेलो होतो?" ग्राम म्हणाला. "तुझ्या आठवणीच्या गोधडीत तर मी कायम शिवलेलो आहे. कसा जाईन तुला सोडून?".

मी नकळत हसले, डोळ्यात टचकन पाणी आलं माझ्या. मी त्याच्याकडे पाहिलं. खरंच! तो काही फक्त संगीत वाजवणारं यंत्र नव्हता, तो तर माझ्या आयुष्याच्या असंख्य आठवणींचा आवाज होता. माझा जिवलग - जादूचा पेटारा...

मनात स्वर आपोआप उमटले..

‘दिल में रख लेना इसे हाथों से ये छूटे न कही.. गीत नाज़ुक है मेरा शीशे से भी टूटे न कही.. गुनगुनाऊंगा यही गीत मैं तेरे लिए.. जलते है जिसके लिए..........’

**– पूनम तोरगल**

- ऑगस्ट २८, २०२५
(हा लेख माझ्या वडिलांना - श्री. ना. मं. तोरगल यांना समर्पित आहे - त्याच्या संगीताच्या प्रेमासाठी)



# Rahul Parthe & Family

## Wishes you









SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

We have **experienced teachers** provide a **structured approach** to **help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores**

**ACT/SAT Test Prep**

- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**

- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**

- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary






BLOOMING BRAINS ACADEMY

GIVE YOUR CHILD AN ADVANCED START!

PRE-K - 5TH GRADE

Our Montessori approach stands apart for its ability to challenge children intellectually while nurturing their emotional and social development.

- Experienced Teachers
- State of the Art Facility
- Extended Days & Hours to be open whenever possible
- Frequent & Effective virtual, mail, and in-person communication.
- Parent Education and Coaching along with Access to an Educational Concierge
- Multiage classes that challenge all students and create opportunities for leadership
- School like you remember focused on academics, creativity and achievement

BLOOMINGBRAINSACADEMY.COM

248-590-2274 | 2111 CASS LAKE ROAD KEEGO HARBOR, MI 48320





*Happy Ganesh Chaturthi*

**from**

**Prakash & Manda Gandhi**

# बाबा

बाबांची आठवण नसे अशी तशी
जरी आपण निघून आलो परदेशी ।।

कधी त्यांच्या  धाकात तर कधी त्यांच्या लाडात
वाढलो वेळोवेळी कळत असे केंव्हा काय त्यांच्या मनात

डोळयांत त्यांच्या राग दिसे दिसता अभ्यासात अधोगती
मिळे शाबासकी लाड करुनि दिसताच त्यातच प्रगती

जाण्या आम्ही परदेशी त्यांचीच  खटपट उतेजन  जोरात
पण जाण्या पूर्वीच म्हणती या बरे लवकर आपुल्या देशात

बाबांचीच ओढ ती आठवणीने डोळे भरती परोपरी
तुलना नसे त्याला आपण आई बाप झालो जरी

हिंडलो सर्व दूर बाबांच्याच कडेवर बसून
नसे गंमत तशी जरी इथे हिंडतो गाडी मधून

मोठे मोठे होत गेलो जरी या जन्मी
तरी ताज्याच राहतील बाबांच्या आठवणी.

**– शुभदा प्रभाकर कुलकर्णी**











## Ganesh Chathurthi chya Subhecha

## from

## Sheetal and Ajay Sonar

# Ganesh Chaturthichya Shubhecha




# || Maharashtra Mandal of Detroit ||




m
MANDAL

# Bhushan Kulkarni & family

## Wishes you all



# Ganesh Chaturthi Chya Hardik Shubhecha!



# नात निघाली कॉलेजला

बिगरी ते मॅट्रिक (आताचं SSC ,ICSC, SR. Cambridge इत्यादी इत्यादी) हा आपल्या सर्वांच्याच आयुष्यातला एक रटाळ प्रवास असतो, परंतु शेवटच्या वर्षी मात्र कॉलेजमध्ये जायचे वेध लागतात आणि त्या excitement मध्ये वर्ष कसं संपत ते कळतही नाहीं. वर्षानुवर्षे घातलेल्या युनिफॉर्मला कायमचा निरोप द्यायची वेळ येऊन ठेपलेली असते आणि आयुष्यातलं एक मोठं स्वप्न साकार होत असतं ते म्हणजे कॉलेजला जाताना सुंदर, fashionable कपडे घालून, हातात दफ्तर न घेता जाणं !

तसं बघायला गेलं तर 'स्कर्ट ब्लाऊज' हा ब्रिटिशांचा ड्रेस, पण आमच्यावेळी स्कर्ट ब्लाऊज हा fashionable ड्रेस समजला जात नसे कारण तो तर शाळेचा युनिफॉर्मच होता, पण पंजाबी ड्रेस घालणं म्हणजे अगदी हटके असे कारण तो Bollywood च्या नट्यांचा आवडता असायचा. तेंव्हा नट्या कपडे कमीत कमी घालण्यात फार पुढे गेल्या नव्हत्या. कधी आपण पंजाबी ड्रेस घालून हातात पर्स आणि एखादं वही-पुस्तक घेऊन कॉलेजला जातो असं झालं होतं.

नंतर शिक्षण संपलं, लग्न झालं आणि अमेरिकेत आगमन झालं. इथे असं लक्षात आलं, तुम्ही कपडे घाला, नका घालू , nobody cares!! असो, पुढे मुलगी झाली, शाळेत गेली, आणि ती सुद्धा high school graduate होऊन कॉलेजला जायची वेळ आली.

(By the way आम्ही शालेय जीवनात कधीच "Graduate" होत नव्हतो. युनिव्हर्सिटी संपल्याची खूण म्हणजे पदवीचा तो डगला असे. स्टुडिओत जाऊन, तो डगला घालून आणि पदवीची सुरळी घेऊन काढलेला फोटो आमच्या जमान्यातल्या सगळ्यांकडे असेल.)

बघता बघता माझ्या मुलीच्या शाळेच्या शेवटच्या वर्षी कॉलेजमध्ये अँप्लिकेशन्स पाठवायची वेळ आली आणि काळ supersonic वेगाने पळतो आहे हे लक्षात यायला लागलं. इथं मुलं एकदा कॉलेज/युनिव्हर्सिटीला गेली की ती पुन्हा घरी राहायला येत नाहीत हा बहुतेकांचा अनुभव आहे. मुलगी लग्न करून सासरी जाते तसाच एक प्रकार! पण म्हणून मुलीचं लग्न करायचं कोणी टाळत नाही ना! आपण आपलं मन घट्ट करून मुलांच्या भवितव्याची स्वप्न बघायची एव्हढंच आपल्या हातात आहे.

एव्हांना त्यांना कॉलेज डॉर्मवर लागणाऱ्या वस्तू गोळा करायची वेळ येऊन ठेपलेली असते. त्यांत मिनी रेफ्रिजरेटर, छोटा TV, bedding वगैरे वगैरे, आणि लवकरच कॉलेजवर जायचा दिवस येऊन ठेपतो. बहुतेक आईबापांच्या आयुष्यातली ही आंबटगोड घटना असते, आणि आम्हीसुद्धा आमच्या मुलीची युनिव्हर्सिटीत पाठवणी केली आणि प्रत्येक सुट्टीची वाट बघत दिवस काढले.




आज माझी नात highschool graduate होऊन कॉलेजला जायला निघाली आहे. माझ्या मुलीला आज लक्षात येत असेल की तीस वर्षापूर्वी तिची आई कुठल्या मानसिक परिस्थितीतून गेली होती. पण माझ्यावर आज दुसऱ्यांदा ही वेळ आली आहे जी पहिल्या वेळेपेक्षा जास्त कठीण आहे. माझं छोटं पिल्लू (पल्लू), आज कॉलेजला जायला घर सोडून एकटी राहण्याइतकी मोठी झाली आहे! छोटीशी, माझ्या अंगाखांद्यावर बागडणारी छकुली कडेवरुन खाली उतरून केंव्हा तीन चाकी सायकल, नंतर दोन चाकी सायकल आणि म्हणता म्हणता चार चाकी चालवायला लागली हे कळलंसुद्धा नाहीं .

माझी मुलगी जेव्हा कॉलेजला गेली तेंव्हा मी नोकरी करीत होते त्यामुळे तिची काळजी करायला मोजका वेळ मिळतो अशी guilt होती, पण आज मी retired असून मला नातीची काळजी करायला भरपूर वेळ आहे. नको नको ते विचार डोक्यात येतात. .... हिला कुठे वाईट संगती तर नाही लागणार? तिथे Fraternity, Sorority का काय असतं तिथे, नीट सामना देईल ना? पण नंतर आपल्याच मनाची समजूत घालायची की आपण केलेले संस्कार फुकट जाणार नाहीत. शिवाय देव आपल्या पाठीशी आहेच आपल्या मुलांचं, नातवंडांचं रक्षण करायला.

आज वीस ऑगस्ट 2025, माझी नात University ला जायला निघाली आहे. Wishing her all the best in academic career as well as या healthy and prosperous life. God bless my little princess.

**– शमा सुखटणकर**


Suhana
Wishes you all
Happy Ganesh Chaturthi!
Suhana
Paneer Tikka
Khaman Dhokla
Vegetable Biryani
Manchurian
Paneer Chilli
Pavbhaji Masala
Mango Pickle
Kitchen King Masala
Celebrate this festive period with Suhana's
63 years old legacy & tradition
SPICE UNIVERSE
SPICE UNIVERSE LLC
info@spiceuniverseusa.com
+1(947)267-1733
spiceuniverseusa.com

# Kiran & Deepa Ingle wish you all

# Happy Ganesh Chaturthi




A J DESMOND & SONS
FUNERAL DIRECTORS

Trusted experts
creating custom goodbyes
reflecting love and life.

AJDesmond.com

TROY • CROOKS ROAD
between Maple & Big Beaver
248.362.2500

ROYAL OAK / BIRMINGHAM
WOODWARD AVENUE
between 13 & 14 Mile
*Vasu, Rodgers & Connell Chapel*
248.549.0500

TROY • ROCHESTER ROAD
between Big Beaver & Wattles
*Price Chapel*
248.689.0700

*memorials | cremation | burial | funerals*

Dhake Industries

The Future of Coatings





- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More






- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet market and Customer Specific Requirements

Global Headquarters

15169, Northville Rd, Plymouth, MI 48170

734-420-0101

www.dhakeindustries.com

श्रीयन बापट

## माझा आवडता सण

२-ब

आपल्या भारत देशात अनेक सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. जसे गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, नागपंचमी मकरसंक्रांत, गणेश उत्सव, होळी इत्यादी. या सर्व सणांमध्ये मला गणेशोत्सव खूप आवडतो. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात गणेश पूजनाने होते. हा सण भाद्रपद महिन्यात येतो. लोक गणेशाची मूर्ती घरी आणतात आकर्षक सजावट करतात. लोक दररोज गणेशाची आरती करतात. गणेशाला गोड नैवेद्य दाखवला जातो, जसे मोदक, खीर, पुरणपोळी, लाडू, इत्यादी.

१

असा हा सण दीड ते अकरा दिवसां-
पर्यंत साजरा केला जातो. अनंत
चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन केले
जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाची
प्रथम सुरुवात लोकमान्य टिळकांनी
केली. वेगवेगळ्या स्पर्धा सार्वजनिक
मंडळे करतात. भारतात माझ्या आजी
कडे दीड दिवसांचा गणपती असतो.
"एक, दोन, तीन, चार, गणपतीचा
जयजयकार, गणपती बाप्पा मोरया, मंगल-
मूर्ती मोरया" असे म्हणत बाप्पाचे
आगमन होते. तिथे धातूची मूर्ती
असते. अशा प्रकारे eco-friendly गणपती

२

साजरा करतो. मला मोदक प्रचंड आवडतात. आई आणि आजीने केलेले नैवेद्याचे २१ मोदक मी संपवतो. दररोज मला झांजा वाजवून आरत्या म्हणायला आवडतात. असे म्हणत बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते. घरीच आम्ही बाप्पाचे विसर्जन करतो. मला खूपच वाईट वाटते आणि अशी घोषणा करत बाप्पाला पुढच्या वर्षी येण्यासाठी आमंत्रण देतो. "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या".

२

– श्रीयन बापट
(ट्रॉय मराठी शाळा)

# PATEL BROTHERS®

## *Wishes you all*



# Dr. Vimal Puri

## Wishes you all





## Ganesh Chaturthi Chya Hardik Shubhecha!

KURRYS
INDIAN CUISINE

24361 Halsted Rd, Farmington Hills, MI 48335

248-826-2014

/kurrysrestaurant

www.kurrys.com

# एक तरी ओवी अनुभवावी



"तेणें कारणे मी बोलेन । बोली अरुपाचे रूप दावीन| ।
अतींद्रिय तरी भोगवीन । इंद्रियांकरवी ।।

ज्ञानदेवांच्या या आत्मविश्वासाच्या तेजाने मी दिपून जाते. ज्या सोळा-सतरा वर्षांच्या युवकाने स्वतःच्या काव्याला "वाग्यज्ञ" म्हणून संबोधिले व पसायदान मागितले, त्यांच्याकडून हीच अपेक्षा, नाही का?

"तैसे शब्दाचे व्यापकपण। देखिजे असाधारण।
पाहताय भावज्ञा फावती गुण। चिंतामणीचे||

शब्दप्रभू असे ज्ञानेश्वर. शब्दांना लीलया खेळविणारे. "आनंदसरोवरीची कमळें", "लावण्यकलिका" अमृतकल्लोळ ", "कुटीलालकमस्तक ", "मोक्षमार्गीचे सुखासन" अशी हजारो शब्दमौक्तिके सहज पेरत जाऊन ओव्या श्रीमंत करणारे. कितीतरी ओव्यांमध्ये या शब्दांचाही पलीकडला गहिरा अर्थ जितका विचार करावा तितका आपल्याला खोल-खोल घेऊन जातो. एखाद्या ओवीपाशी तर आपण थांबतोच, आणि विचार करतो की हा अनुभव आला तर आपले आयुष्य किती संपन्न, किती कृतार्थ होऊन जाईल.

म्हणतात ना, मोठी यात्रा करण्याची महत्त्वाकांक्षा असेल तर पहिले पाऊल तरी उचलायला लागतेच ना? तर हे माझे पहिले पाऊल. पण ओवी अनुभवण्या आधी तिचा मतितार्थ यथाशक्ती, यथामती समजायला तर हवा..... अर्थात हे धाडस करतांना मला माझ्या मर्यादांची जाणीव आहेच. माझे पाय अजून केशवसुत, बालकवी, कुसुमाग्रज यांच्या इयत्तेतच घोटाळत आहेत. तरीही लहान तोंडी मोठा घास घेण्याचा हा प्रयत्न. जर झालाच परमेश्वर प्रसन्न, आणि खुश होऊन म्हणाला की वत्से, तुला कोणती ओवी अनुभवायची आहे ते सांग, मी सगळी तजवीज करतो. मी या ओवीची विनंती करीन-----

"जैसा दीपें दीपु लाविजे। तेथ आदिल हे नोळखिजे।
तैसा सर्वस्वे मज भजे। तो मीचि होऊनी जाये||

"सर्वस्वे मज भजे " हे या ओवीमधील मुख्य सूत्र आहे असे मला वाटते. जेव्हा आपण प्रार्थना करतो, तेव्हा अनन्य भावाने शरण जावे, पण "सर्वेपि सुखिनः सन्तु " याशिवाय काही मागू नये. मीरा जशी कृष्णमय होऊन गेली होती, राधा जशी कृष्णहृदयच झाली होती, तसे कृष्णरुपात विलीन होऊन जावे. सायुज्यमुक्ती, समाधी, समर्पण वगैरे मोठ्या-मोठ्या शब्दात न अडकता केवळ तत्-मय म्हणजे तन्मय होऊन जावे. हा अनुभव, ही असीम भक्तीची अवस्था मला फार हवीहवीशी वाटते. ज्ञानेश्वरांनीच अकराव्या अध्यायात म्हटले आहे-

"तेही एक विश्व आपण । ऐसे अळुमाळ होते जे दुजेपण| तेही आटोन गेले अंतःकरण ।
विरालें सहसा ।। ११:४४५

मंदिरात भक्तजन शांतपणे बसलेले असतात. देवमूर्तीकडे अनिमिष नजरेने बघत असतात... मला त्यांच्या डोळ्यात हीच अभिलाषा दिसते- सर्वस्व अर्पून राम -मय, कृष्ण-मय , दुर्गा-मय होऊन जाण्याची. ही ओवी मला कधीतरी अनुभवायला मिळावी ही माझी प्रार्थना आहे.

– डॉ. वीणा शाह

**गणपती बाप्पा मोरया**




JAYA TRAVEL & TOURS

# Europe Tours Starting at $1,999






*49 years of tour planning experience!*

To Book Call 1-800-209-0187 or Email letsgo@jayatravel.com

## All-inclusive land packages with:

- Daily Indian vegetarian and non-vegetarian meals with Jain or Swami Narayan food available with request
- Guaranteed departure dates April through October
- Superior hotel accommodations
- Sightseeing, excursions, entrance fees, and transfers
- Jaya Travel tour manager throughout the tour

For details

# Gangadhar & Pushpa Vaishampayan

*Wish you all*




Proud to Support Those
Who Help So Many
HERITAGE
INSURANCE
With best compliments of Heritage Insurance Holdings, Inc.
and Vijay S. Walvekar, a Co-Founder and Directior.
heritagepci.com
855-536-2744

# बाप्पा

बाप्पाच्या येण्याने झालो मी धन्य
रोज रोज आरत्या, मोदक भिन्न भिन्न

सोहळा तो अजब, वर्णावा किती
प्रसादाच्या आग्रहाची आता वाटते भीती

मित्रांच्या गप्पांना, कसले कुंपण नाय
मोदी पुतिन ट्रम्प, हाय काय नाय काय

साड्यांच्या रांगा, रंगांची उधळण
महिलांच्या हास्याला, लाजण्याचे कोंदण

आल्या त्या गौरी, काहिश्या उशिरा
बागडून दोन दिस, जातील बिचाऱ्या

वाटतात  हे दिवस, सॉलिड मंतरलेले
आठवणी जुन्या, होताच डोळे पाणावलेले

पाहता पाहता येईल तो विसर्जनाचा 'डे'
ढोल आणि ताशा, धिंगाणा चोहीकडे

मिरवणुकीची मज्जा, उद्या ऑफिसची सजा
रातभर नाचल्याच्या, ऐकू या आता गमज्या!

**– संजय अहिरे**





*Dr. Rajpurkar*

**Wishes you all**
**Happy Ganesh Chathurthi**

# Law Office of Leila Freijy PLLC

U.S. Immigration Law

## *Wishes you all*





# गणपती बाप्पा मोरया




## Wish you all Happy Ganesh Chaturthi



SENSORY
REHABILITATION

**OUR VISION**

Our vision is to continually seek to be an exceptional, patient-centered healthcare staffing organization that you can always trust.

**OUR MISSION**

Our mission is to meet the equitable needs of our clients so that they have the necessary resources to reach their highest potential.

**OUR SERVICES**

We are premium provider of various health care services including physical therapy, occupational therapy, speech therapy, and nursing.

## ABOUT US

Healthcare industry works tirelessly to provide exceptional care to everyone in need while facing many challenges. Challenges related to staffing, in particular, have become complex over the years and this is why Sensory Rehabilitation, LLC was established in 2017.

We work to create and develop a supplemental workforce consisting of motivated, talented, and highly-qualified professionals who meet the needs of your patients and facility. We really focus on getting to know you and your organization prior to delivering a provider who is right for both you and your patients.

## WHY CHOOSE US?

- 8 YEARS IN HEALTHCARE STAFFING SERVICES.
- FOSTER A CULTURE OF CARE, TRUST, HONESTY, RESPECT, AND BENEVOLENCE.
- PLACEMENT IN HOMECARE AS WELL AS OUTPATIENTS SERVICES.
- MORE THAN 25+ H1 APPROVAL AND 5 GREEN CARD APPROVALS.

sensoryrehabservices.com
4413, Reilly Ct, Troy, Michigan, 48085
sensory18@gmail.com
248-719-4827

# कधीकधी संध्याकाळी

कधीकधी संध्याकाळी
भकास भकास वाटू लागतं
एखाद्या अनाम दुःखाचं
सावट मनी दाटू लागतं

घडून गेलेल्या बऱ्या-वाईटाचा
हिशेब मन मांडू लागतं
बेरजांपेक्षा वजाबाक्या जास्त
नकळत अश्रू सांडू लागतं

नशीब,देव वगैरे असतं का?
भयाण प्रश्न मांडू लागतं
इतरांच्या सुखाचे दाखले देत
स्वतःशीच मग भांडू लागतं

मनातल्या या वादंगाचा
दिसत नाही कुठेच अंत
अनुत्तरीत प्रश्नांची मग
लागून राहाते उगाच खंत

तरीही प्रश्नांचा हा पसारा
नेटाने मी आवरू लागते
त्या एका संध्याकाळी पुरती का होईना
स्वतःशीच सारवासारव करू पहाते



**– विभावरी देशपांडे**

गणपती बाप्पा मोरया


kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!
REALTOR®, KASHMIRA DESAI
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is ACTIVE, PENDING & SOLD in your
Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com
Each Keller Williams Office is
Independently Owned and Operated


dwarkamai
KITCHEN FOOD
3709 Bristol Drive Troy 48083
Sushama Mansukh : +1-7347768492 | +1 - 7342337348
E: dwarkamaikitchenfood@gmail.com
Follow us on:




RASNA

FOODS

# Happy Ganesh Chaturthi Wishes

HONEST®

SKIP THE LINE, ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI
248.315.0234



# चालता चालता

मला चालायची आवड कशी लागली नि वर्षानुवर्षे ती कशी वाढत गेली हे माहीत नाही.





लहानपणी कोल्हापुरात उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही जमलेली सगळी मामे-मावसभावंड एका मामीकडे नाश्ता करायचो आणि मग दुसऱ्या मामीकडे चालत जायचो नि परत नाश्ता करायचो. संध्याकाळी नेहमीच आमचा दौरा असायचा -राजारामपुरीतून रेल्वे लाईनला, टेंबलाईला, आंबाबाईला, रंकाळ्याला आणि खूप वेळा शिवाजी विद्यापीठात मग सायकल जमल्यावर कळंब्याचा तलाव नाहीतर उजगावपर्यंत ही पोहचायचो. वाटेत मित्रमंडळींना भेटायचो, खूप वेळा आजीसाठी गोकुळचा बटाटेवडा आणायचो. कधी कधी कळायचं नाही, चालण्याच्या गतीला गप्पांचं की सहवासाचं इंधन अधिक प्रभावी ठरतं!

पुण्यात मात्र शाळेत असताना १०वी पर्यंत सगळ्या संध्याकाळी ग्राउंडवर लंगडी-खोखोच्या सरावात नि गप्पात कशा निघून गेल्या ते लक्षात देखील आलं नाही. मग ११वीत गेलो तेव्हा सायकल हातात आली नि दोनदोन क्लासना जाताना वाटेतल्या गणपती-मारुतींना एका हाताने नमस्कार करत हिंडू लागलो.  मित्रांबरोबर जायचं, परत येताना प्रत्येकाच्या घराच्या कोपऱ्यावर गप्पा मारत थांबायचं आणि मजल दरमजल करत रेंगाळत घरी पोहोचायचं. त्यावेळी मी उन्हाळ्याच्या सुट्टीत काही आयुष्यभराच्या जवळीकी जमवल्या आमच्या आणि दुसऱ्या शाळांमधल्या. कधीतरी पर्वती चढून जाणं नाही तर खडकवासल्यापर्यंत सायकल हाणणं! केवळ शालेय वक्तृत्व नि निबंध स्पर्धांमध्ये माहीत असलेल्यांशी बोर्डासाठी तयारी करताना घनिष्ठ ओळखी झाल्या.

मग पुढे कॉलेजमध्ये दांडी मारूनं सिनेमाला जाणं, बालगंधर्वला प्रदर्शन व बटाटावडा, सुजाताची मस्तानी नाही तर गंगाराम मंगारामची लस्सी चाखणं. कॉलेजात गेल्यावर वैशाली-रुपालीला बसणं - कधी लोखंडे तालमीजवळ पंडितकडे. वेगवेगळ्या चमूंबरोबर वेगवेगळे विषय, खाणं पिणं मजेत चालायचं. वाटून खायचं त्याचबरोबर सुख-दुःख वाटायची असा सहप्रवास! सवड मिळाली की फर्ग्युसन रोडवरून बीएमसीसीच्या गुलमोहराला नि प्रभात रोडच्या गल्लीत आकाशजाईना भेट द्यायची. त्या गल्ल्यांमधून जाताना हातात सायकल धरून गप्पा मारत, बाजूची बदाम-चंदन-बुचाची झाडे न्याहाळत जाणं विलक्षण आनंददायी असे. त्यात जर पुण्याची गुलाबी थंडी असेल तर छानच!

पुणे विद्यापीठात शिकायला गेलो तेव्हा तिथली गर्द झाडी कॅन्टीन्स, हॉटेल्स आणि ब्रिटीश साम्राज्याच्या खुणा जपणाऱ्या मोठ्या इमारती यात गुंतलो. नवे मित्र झाले - विशेषतः काही बाहेरगावचे, काही जुने/पुण्यातले तर काही परदेशी शिकलेले. नव्या प्राध्यापकांशी ओळखी व वेगवेगळ्या विषयांची तोंडओळख झाली आणि काहींशी आयुष्यभराच्या मैत्र्या व आवडी जुळून गेल्या. फार दिवस राहिलो नाही मी तिथे पण मला वाटतं खूपशा रुक्ष अभ्यासक्रमात नव्या ओळखींबरोबरचे फेरफटके माझी नवी नाती दृढ करून गेले.

त्यात भर पडली माझ्या मामांच्या चालत हिंडण्याच्या आवडीमुळे! माझ्या दोन्ही मामांना चालत जायला आवडायचं. विशेषतः धाकट्या मामांना गुलाबाच्या झाडांची आवड! त्यामुळे ते पहाटे कोल्हापूरहून पुण्यात आले की सकाळीच त्यांना पेरुगेटकडून अलका टॉकीज जवळच्या देशपाड्यांच्या गुलाबाच्या नर्सरीत जायचं असायचं नाही तर 'पोचा सीड्स' किंवा 'शेंबेकर बी' बियाणांच्या किंवा गार्डनिंग अवजारांच्या दुकानाला भेट द्यायची असायची. विशेषतः गणपतीच्या वेळी ते गायकवाड वाड्यातल्या रोज शो ची वेळ साधून यायचे. त्यांच्याबरोबर साधना मासिक, वन-आरोपणाचे डोंगरावरील प्रयोग वगैरे बोलायला मिळायचं. त्यांच्या घरी उन्हाळ्याच्या सुट्टीत माझी गोनीदांच्या 'माचीवरला बुधा'शी आणि 'दुर्गभ्रमण यात्रे'शी ओळख झाली. दुर्गाबाईंच्या ऋतुचक्राच्या प्रेमात तेथेच पडलो. नंतरच्या काळात फूलभेटने मला भुरळ घातली नि मानवशास्त्रीय दृष्टिकोनाबद्दल कुतूहल आणि आश्चर्य जन्माला घातलं, ३०-४० गुलाबाच्या रोपट्यांची काळजी घ्यायला शिकलो, नारळ लावण्यासाठी मुरमात मोठे खड्डे खणले. त्यातून फळत्या-फुलत्या झाडांची वाट पाहायची सवय लागली. चालणं, वाचणं यातून निसर्ग न्याहाळणं, त्यात हरवून जाणं असं जुळून यायला लागलं. मामा अजूनही चौऱ्याण्णाव्या वर्षी सांगत होते, जुने पेशंट भेटायला आले की आनंद होतो.

त्यांचे पेशंट इथे अमेरिकेत भेटले तरी भरभरून सांगत असतात की आम्ही घरातली तिसरी पिढी म्हणून. मला वाटतं, त्यांचा हा निरंतर उत्साह त्यांच्या चालणं-वाचण्याच्या जपलेल्या सवयीतून आलाय अन् मला स्फूर्तिदायी आहे.

मला वाटतं चालण्याचं बाळकडू घरातून जास्त मिळालं. आमच्या वडिलांचे तीन सख्खे मित्र होते-सूर्यवंशीकाका, सोमणकाका आणि देवधरकाका. वडील ऑफिसमधून घरी आले की थोड्या वेळाने हे चौघे आमच्याकडे जमायचे नि मग अप्सरा हॉटेलपर्यंत चालत चक्कर मारून यायचे.  गंमत वाटते की त्याकाळी मोबाईल नसताना वेळा ठरवून न चुकता नेमाने भेटायचे. माझे आई वडीलदेखील सवड मिळाली की डेक्कनला 'पुणा कॉफी हाउस'ला कॉफी, कधी तरी वडा खाऊन यायचे. आमच्या आईला आजीचीच आवड आलेली होती बहुतेक. अगदी नव्वदी उलटल्यावरही खरेदीला सुनेबरोबर नाहीतर लेकीबरोबर लक्ष्मी रोडला जाऊन मग स्वीट होमला वडा कॉफी घेणार. मग स्वतः बाहेर पडेनाशी झाली तेव्हां त्या दोघींना येताना आणायला सांगायची.

दुसरा अनुभव पुण्याचा. मुंबईचे माझे दुसरे मामा पुण्यात २-३ दिवस सुटीला सहज यायचे आणि श्रेयसला राहायचे. सकाळी घरी चक्कर मग मला घेऊन थेट बंड गार्डनला पाणी बघायला हिंडायला. मग कधी एम्प्रेस गार्डनला फुलबागा बघायला तर कधी माजोरियन व कयानीला भेट! चालता चालता वाचनाबद्दल बोलणं व्हायचं. पुलंच्या संगीताबद्दल नाही तर शरू रांगणेकरांच्या मॅनेजमेंटवरील पुस्तकांबद्दल. खुशवंत सिंग त्यांना विशेष आवडायचे. त्यामुळे मलाही 'इलस्ट्रेटेड वीकली'ची आवड लागली.

मुंबईचा अनुभव त्यांचे धाकटे भाऊ इंग्लंडहून परतले तेव्हाचा. आम्ही भावंडं माहीम-दादरहून ट्रेन घेऊन शुक्रवारी दुपारी चर्चगेटला जायचो. तिथून पोर्ट ट्रस्टला त्यांच्या ऑफिसला, ऑफिसमधून ते बाहेर पडले की मग तिथल्या जवळच्या थेटरला इंग्रजी सिनेमा पाहायचा नाहीतर तिथल्या पुरोहितला किंवा जवळ चहा सामोसा व्हायचा. कधी तरी कला प्रदर्शन बघायला नाही तर मरीन लाइन्सवर किंवा झाडांच्या रांगांमधून चालायचं. ते कित्येक वर्ष वर्ल्ड ट्रेड सेंटरला काम करायचे तेव्हा त्यांच्या ऑफिसमधून राणीचा नेकलेस फारच देखणा दिसायचा. काही महिन्यांपूर्वी त्यांना पवई लेकजवळ 'वेस्टिन'ला भेटलो तर आता ९३व्या वर्षी आपली डायरी घेऊन भेटायला आले कारण काही विसरायला नको! मग अगदी ब्रह्मविद्येचा, दहा वर्षापूर्वी, कसा अभ्यास केला त्याची माहितीपत्र, संपर्क यादी व्यवस्थित दिली. तो उत्साह आणि आनंद निश्चितच प्रेरणादायी.

शाळा कॉलेजात ज्यांच्याबरोबर हिंडलो फिरलो त्यांची मैत्री खोल रुजली ती दीर्घकाळ टिकून आहे. बरोबर काढलेला काही वेळा काहीसा अबोल प्रवास पुढे सायकल - पायांपेक्षा - लिखाण व मेल यातून दृढ झाला. विशेषतः काही जण व्यावसायिक शिक्षणासाठी बाहेरगावी गेले किंवा दूर कामाला गेले, मग मी उच्च शिक्षणासाठी बाहेर पडलो आणि  कागद लेखणी यातून नाती जपली, जोपासली. घरच्या व मित्रांच्या पत्रांनी एकटेपणी सोबत केली. मैत्रीतून चालणं झालं म्हणण्यापेक्षा मला वाटतं चालण्यातून मैत्री दृढ झाल्या, सख्खे -मामे वगैरे नात्यांचा फापट पसारा उपटला नाही. जाता जाता गप्पा झाल्या, चवीचं खाणं झालं, निसर्गाची सोबत मिळाली आणि त्यातून काही आणखी शिकायला मिळालं. या चालण्याच्या वाटेकडे पाहिलं तर मला वाटतं हे नुसतं चालणं नाही, माझ्या मैत्री आणि नाती जपणुकीचा एक आलेखच आहे. हा असाच वृद्धिंगत होवो हीच सदिच्छा!

**– डॉ. देवदत्त कुलकर्णी**

KARMA REALTY
HOLDINGS LLC
ARCHITECTURAL CONSERVATION THROUGH URBAN LIVING AND WORKING SPACES



# Happy Ganesh Chaturthi wishes from







---

**Leske Family Dental is committed to providing integrative, quality dentistry to your entire family in a friendly and compassionate environment.**

LESKE
FAMILY DENTAL

**248-828-3091**

5895 JOHN R RD TROY, MI 48085

**DR. AUSTIN LESKE** **DR. CHASE LESKE**

*LESKEFAMILYDENTAL.COM*

**DR. DANIEL LESKE**

*5% Discount for MMD Members*






FORTUNE FOREVER

FINANCIAL SERVICES



Wishes you all



# उंच उंच माझा झोका



उंच उंच माझा झोका, झोका बांधला आकाशाला
झोका चढता, उतरता झाला पदर वारा-वारा

झोक्याला देते वेग, पाय टेकून धरणीला
लाल मातीच्या परागाचा, रंग चढतो पावलाला

झोका चढतो पूर्वेवर, जाईजुईनी सावरीला
दंवा धुक्याचा शुभ्र साज, अंगावरती चढविला

झोका चढतो पश्चिमेला, वेल लालन देते तोल
मोकळ्या केसांमधे, गुंफी सनया लाल लाल

झोका चढतो उंच उंच, पाय पोचती मेघांवरती
इंद्राच्या डोहावरी, लाल पाखरे पाण्या येती

झोका चढतो उंच उंच, मला थांबता थांबवेना
गुंजेएवढे माझे घर, त्याची ओळख आवडेना

फार वर्षांपूर्वी पद्मजा फेणाणी यांचा "घर नाचले नाचले" हा गीतसंचय आला होता, ज्यात त्यांनी इंदिरा संत यांची ही कविता सुंदर गायली होती. काळाच्या ओघात ते गीत माझ्या विस्मृतीत गेले होते.

नुकताच मी पेरू या देशाची सैर करून आलो. तिथे भ्रमंती करत असताना एके ठिकाणी एक डोंगराच्या अगदी कडेला दोन मोठाले झोके होते. झोका घेताना त्याची अर्धी चक्री वर डोंगरावर, तर अर्धी खालच्या दरीवर असे होते. त्यावर बसून मी आपली झोक्यावरची आठवेल ती गाणी गुणगुणत होतो त्यात एकदम हे गीत आठवले. मग पुन्हा एकदा ते गाणे शोधून मी काही वेळा ऐकले. आधी ऐकले होते तेव्हा मला त्यातले फारतर संगीत सौंदर्य जाणवले होते. पण पुन्हा ऐकताना मला त्यातले काव्य सौंदर्य भावले.

इंदिराबाईंच्या बहुतेक कविता तरल, भावनाप्रधान असतात. साध्या तरी सुंदर शब्दात वरवर हलक्या वाटणाऱ्या या कविता काहीतरी खोल भाव सांगून जातात. ही कविता देखील मला तशीच वाटली. आधीची सर्व कडवी, आणि शेवटच्या कडव्यातली पहिली ओळ वाचून असे वाटते की एखादी स्त्री झोक्यावर मुक्त आनंद घेत आहे. आणि ते करताना तिच्या कल्पनेचे फुलपाखरू निरनिराळे भाव व आभास अनुभवत भिरभिरत आहे.

पण शेवटच्या ओळीवर मी काहीसा थबकलो. "गुंजेएवढे माझे घर, त्याची ओळख आवडेना”. आधी सर्व काही छान, आनंदी, positive भाव असताना या शेवटच्या वाक्यात काहीतरी आवडत नाही हा negative विचार कशाला? मग विचार करता मी त्याचा असा अर्थ लावला - पूर्वी स्त्रियांचे विश्व हे घरापुरतेच मर्यादित असे. घर सांभाळायचे, घरच्यांचे करायचे हाच नियमित राबता असे. घराबाहेरचे विश्व काय असते, कसे असते याचा अनुभव त्यांना वंचितच असे. पूर्ण घर सांभाळण्याची क्षमता असतानादेखील एका अर्थी त्यांना आश्रित, पुरुषांवर निर्भर असेच मानले जायचे. मग असे वाटले की या कवितेतल्या स्त्रीला झोका घेताना जी मोकळीक, स्वातंत्र्य, मुक्तता वाटते, जिला बाहेरच्या विस्तारित जगाची दृष्टी लाभते, तिला मग स्वतःचे ते घर गुंजेएवढे छोटे वाटायला लागते आणि त्याची ओळख आवडेनाशी होते.
आज सुदैवाने ती परिस्थिती नाही. स्त्रियांना स्वातंत्र्य आहे, घराबाहेर पडून इतर क्षेत्रात आपला ठसा उमटवायला अनेक संधी आहेत. पण जगात सर्वच लोकांना, स्त्री असो वा पुरुष, असे स्वातंत्र्य आहे का? "परवशता पाश दैवे ज्यांचा गळा लागला" ही जगात बऱ्याच ठिकाणी अजूनही वस्तुस्थिती आहे. त्यांचे घर अजून गुंजेएवढेच आहे. त्यांचा झोका अजून उंच जायचा आहे.

पुन्हा कवितेवर येत मी इतकेच म्हणेन की कविता आणि त्याचा अर्थही झोक्यासारखा मुक्त असतो. कवीला अमुक एक अर्थ अभिप्रेत असेल तरी वाचकाला हवा तो (logical) अर्थ लावायचे स्वातंत्र्य असते. केवळ त्यामुळेच कविता जुनी, शिळी न होता ताजी, relevant राहते.

**– सुरेश नायर**
१७ ऑगस्ट '२५


INDURA dream™
College Comfort
Done right.
The InduraDream Topper is the upgrade your student deserves.
✓ 3 inches of breathable, body-aligning comfort
✓ Zero toxic foam, zero heat-trapping
✓ Dorm- and apartment-approved
✓ Fast, free shipping+ 30-day trial
SCAN TO VISIT OUR WEBSITE

# Host and Hospitality



Stepping into the role of a 'Host and Hospitality co-lead' for the very first time at Maharashtra Mandal of Detroit has been one of the most memorable journeys of my life. This experience gave me the chance to work with different people on multiple events, each of whom brought their own uniqueness, energy, and perspective. Every interaction became a new learning opportunity and helped me grow both personally and professionally. One of the most rewarding parts of this journey was meeting and interacting with so many renowned artists. To be around such extraordinary talent — to witness their humility, dedication, and passion up close — filled me with a special kind of energy and inspiration. It reminded me how powerful art and community can be when they come together.

In this journey, I feel truly blessed to have had the constant guidance and support of Surekha Pokle, my co-lead. She has been a pillar of strength for me, always present with her encouragement, wisdom, and warmth.

I would also like to take a moment to appreciate all the team leads and members who are working together so passionately toward every event. The way everyone comes forward with dedication, creativity, and teamwork truly inspires me. Watching each team contribute their best and seeing all the efforts blend seamlessly into successful events is heartwarming. It feels like being part of one big family, where every hand and every heart is working together for the same purpose.

This experience has been more than just a role; it has been a journey of growth, connection, and gratitude. I carry with me the joy of creating welcoming experiences, the energy of being surrounded by art and artists, and the invaluable lessons of leadership and teamwork. My heart is full, and I feel truly honored to have been part of this chapter at Maharashtra Mandal of Detroit ❤️

**– प्रांजली आढाव**


Happy Ganesh Chaturthi!

Soul
PELVIC FLOOR THERAPY

Dr Renu Pathak

https://soulpelvicfloortherapy.com/

Ph : 248-710-3367


Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500


GLOWING SMILES DENTAL
Dr. Kulbir (Nikki) Jassal, D.D.S.
1755 W Big Beaver Rd,
Troy, MI 48084
(248) 643-7530
www.glowingsmilesdental.com


EXPERIENCE THE LIFE
MI ADVENTURES'23
MI Adventures'23
Bring Adventure Dream to Reality !
Kailash Mansarovar Parikrama (KMP)
Mt. Kilimanjaro
Everest Base Camp
Great Migration Safari
TRIPS ALL OVER THE WORLD
Destinations : Kilimanjaro | Kailash Mansarovar Parikrama | Dolomites | Patagonia | Char Dham | Adi Kailash | 14er | US National Parks
We also customise Adventure, Spiritual and Leisure tours/trips as per your needs .
View all the trips at:
Contact :
Pankaj Dahad :
+1 248 854 2092
Visit us : www.miadventures23.com

# काय आणलं?

'काय आणलं' हा प्रश्न लहानपणापासून आत्तापर्यंत आपल्याला बरेच वेळा विचारला गेला असेल किंवा आपण तरी कोणाला नक्कीच विचारला असेल. अगदी लहानपणी आई बाहेर गेली तर येताना तिने 'काय आणलं' यावर आमची नजर असायची. (म्हणजे एखाद्या गारूडीच्या टोपलीतून काय निघतंय, याची उत्सुकता जशी लहान मुलांना असायची( तेव्हां तरी होती!) अगदी तशीच. कारण आईच्या पिशवीतून कधी बोरं, रायण्या, जांभळं, आवळे ह्यासारखा रानमेवा निघायचा तर कधी चिंच, कवठ, कमरकाकडी किंवा कैरी सारख्या आंबट गोष्टी (तेव्हा त्या खूप आवडायच्या) असायच्या. कधी काका, मामा, आत्या, बाहेरगावाहून आले तर त्यांनी माझ्यासाठी काय आणलं, हा बाळबोध प्रश्न मला नेहमी मनात येई. कारण तेव्हा मिळणाऱ्या साध्या, छोट्या गोष्टींचं पण अप्रुप होतं. मग त्यात कधी लाकडी खेळणी, किंवा भातुकलीची सुंदर भांडी किंवा एखादी छोटीशी बाहुली असली तरी त्याचं कौतुक वाटायचं. आता जग बरंच पूढे गेलंय(व आम्हीपण वयाने मोठे झालो!), आर्थिक सुबत्ता आली व प्रगती झाली. सगळ्याचा व्याप वाढल्याने पूर्वी लोक फक्त बाहेरगावी जायचे त्याऐवजी, विदेश वाऱ्या सहजपणे करू लागले आहेत. साहजिकच, 'काय आणलं' या प्रश्नाची उत्तरे पण आता बदलली.



आमच्याच बाबतीत सांगायचं तर आजपर्यंत आमच्या अमेरिकेच्या इतक्या फेऱ्या झाल्या की आता हा आकडा मोजायची तसदी सुद्धा घेत नाही. तर अमेरिकेच्या पहिल्या ट्रीपमधे 'काय आणलं' असं कोणी विचारलं तर आम्हाला आवडायचं व त्या उत्साहात आम्ही तिथून आणलेल्या गोष्टी त्यांना दाखवायचो व ते पाहताना त्यांना कौतुक पण वाटायचं .

सुरुवातीला इथे मिळणाऱ्या विविध चॉकलेट्स - मोदकाच्या आकारापासून Hershey's चे dryfruits युक्त mini लाडू - ( हे आम्ही दिलेलं भारतीय नांव) व इतर bars आमच्या बॅगेत असायच्या. त्याशिवाय डॉलर स्टोर मधे मिळणारे पक्षी, रेखीव नक्षी असलेल्या सुबक डब्या, प्लास्टिकची फुलं, gift bags किंवा gift papers, इथले Western कपडे यासारख्या अनेक वस्तूंचे आकर्षण असायचे. पण आता ह्या सर्व गोष्टींनी सगळ्यांचं (देणाऱ्याचं आणि घेणाऱ्याचं) पोट व मन भरलंय. आता अशा वस्तूंची भारतात देखील कमी नाही. एकूणच अशा गोष्टींचं आकर्षण आता ओसरलंय. मग आता अमेरिकेतून 'काय आणलं' याचं उत्तर काय? का हा प्रश्नच निरर्थक आहे, याचा मी विचार करु लागले.

इथे आल्यावर विविध प्रांतातील (भारतातील किंवा इतर देशातील) विविधभाषिक, विविध चाली- रिती असलेल्या किंवा वेगवेगळ्या प्रकारची कामे करणाऱ्या लोकांशी ओळख होते तेव्हां त्यांच्या संपर्कात आल्यावर जाणवतं की हे जग किती वैविध्यपूर्ण गोष्टींनी भरलेलं आहे, ज्याबाबतीत आपण अजाण आहोत. मग अमेरिकेहून 'काय आणलं' या प्रश्नाचं उत्तर मी शोधते व मला सापडतं देखील...!

अमेरिकेच्या वास्तव्यात माझी library ची visit ठरलेलीच. मग तिथून आणलेलं एखादं छान पुस्तक हाती लागतं ( जे खरंतर इथे popular असतं पण मला याचा गंध ही नसतो. अशा यादीत Jonathan Livingston Seagul सारखं inspiring पुस्तक सापडतं, तर कधी 'young girl 's diary ' सारखं मनाला उभारी देणारं पुस्तक मिळतं. 'मलाला' सारख्या पाकिस्तानी lady(Nobel prize winner)ची माहिती कधी इथल्या वाचनात मिळते तर आपल्या भारतातील 'केसरी ट्रावेल्स' चा पाया कसा रोवला गेला, त्याचा व्याप कसा वाढत गेला, त्यात काय अडचणी आल्या व त्यावर मात कशी मिळवली...या सर्व गोष्टींचं आकलन अशा एखाद्या पुस्तकातूनच होतं. अशी माहिती मी जमेल तेवढी मनात साठवते व 'काय आणलं' याचं उत्तर मिळवते. इतकंच काय अगदी साध्या गोष्टींमधून पण खूप काही शिकता येतं. मग त्यात शाळेत शिकणाऱ्या नातवंडांनी सांगितलेल्या academic गोष्टी असोत G.K. असो, drawing and craft सारखे interesting विषय असोत. त्यात नविनता असते, नवीन आईडिया असतात, ज्या मनाला भावतात व हे इतकं साधंसोपं आपल्याला का सूचलं नाही याची खंतही वाटते. मोबाईल वर Spelling Bee, Wordle, Global सारखे games किंवा इथले काही outdoor, indoor, board games यांची माहिती मिळते व वेगळं काही गवसल्याचा आनंद मिळतो. अर्थात आता भारतासारख्या प्रगतीशील देशातही हे सर्व थोड्याफार प्रमाणात आहेच.

पण तिथे असताना घरातील जबाबदारी, इतर व्यवहार सांभाळून, अशा गोष्टींसाठी वेळ कमी मिळतो. त्याची भरपाई मग मी इथे लेकीकडे आल्यावर करते. आणि हो, एक तर सांगायचं राहिलंच! इथल्या regular कराओके ग्रुप मधे नविन मित्रमैत्रिणींकडून विविध गाणी ऐकायला मिळतात त्यामुळे विस्मरणात गेलेल्या गाण्यांमध्ये पुन्हा एकदा मन रमते. Nostalgic होण्याचा आनंद काही वेगळाच... .अरिजीतसिंग सारख्या (आमच्यासाठी) नवीन गायकांनी गायलेली गाणी कोणी म्हणतं तेव्हा अशा गाण्यांचा आस्वाददेखील घेता येतो. खरं तर अशा गोष्टींची यादी लांबलचक होईल!

सांगण्याचं तात्पर्य एवढंच की माझ्या डोक्याच्या परडीत (किंवा पिशवीत) मी अशी विविधरंगी विचारफुले भरत असते व वेळ आली की ती ज्यांना interest असेल त्यांना वाटत फिरते. तेव्हांच मग अमेरिकेहून 'काय आणलं' चं हे उत्तर माझ्यासाठी लाखमोलाचं ठरतं.

**– सौ. वसुधा टाकळकर**


Happy Ganesh Chaturthi Wishes




Ganesh Chaturthi
Chya Hardik
Shubhecha!
Ram Creations
Jewelry & Gifts
FOLLOW US
28974 Orchard Lake Rd
Farmington Hills, MI 48334
248.851.1400 | info@ramcreations.com | www.ramcreations.com

# Ganesh Chaturthi Chya Shubhecha!

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



## The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com